**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २२७ । गुरुवार ४ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# प्राजक्त तनपुरे बिनविरोध

## राज्यात सहा जागांवर बिनविरोध निवडी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विधानपरिषद निवडणुकीत भाजपचे प्राजक्त प्रसाद तनपुरे हे यांची बिनविरोध निवड झाली आहे. आज, गुरुवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चारही अपक्षांनी आपले अर्ज मागे घेतल्याने तनपुरेंच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला.



दरम्यान पानसरे यांनी अक्षेप घेतल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय राखून ठेवला असून सायं. ७ वाजता यावर निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघाच्या १७ जागांसाठी

### नाट्यमय घडामोडी

महायुतीचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांच्या बिनविरोध निवडीसाठी जोरदार प्रयत्न सुरू होते. उमेदवारांची मनधरणी केली जात होती. तनपुरेंच्या विरोधात काँग्रेसच्या पाठिंब्यावर करण ससाणे यांनी अर्ज भरला होता, तर इतर तीन अपक्ष रिंगणात होते. अर्जमाघारीच्या वेळी ससाणे आऊट ऑफ कव्हरेज झाल्याने महायुतीची धाकधूक वाढली होती. परंतु नंतर ते संपर्कक्षेत्रात आले व त्यांनी आपला अर्ज मागे घेतला. नगरसेवकांच्या आग्रहास्तव मी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. निवडणूक लढवण्याची इच्छा नव्हती, नगरसेवकांशी चर्चा करून माघार घेण्याचा निर्णय घेतला. मी महाविकास आघाडीकडे उमेदवारी मागितली नव्हती. स्थानिक पातळीवर अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला होता, असे ससाणे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

### दत्तात्रय पानसरेंचा म्हणाले, मी अर्ज मागे घेतलाच नाही!



करण ससाणे यांच्यासह इतर तीन अपक्ष अशा सर्व उमेदवारांनी माघार घेतल्याने तनपुरे यांची बिनविरोध निवड झाल्याचे सांगण्यात येत होते. परंतु अर्जमाघारीची वेळ संपल्यावर दुपारी ३ वाजेनंतर पानसरे जिल्हाधिकारी कार्यालयात आले व खोटी सही करून माझा उमेदवारी अर्ज माघारी घेण्यात आला आहे. मी अर्ज मागे घेतलेला नाही. अर्ज कायम न ठेवल्यास आत्महत्या करेन, असा पवित्रा घेतला. त्यामुळे काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊन पानसरे चर्चेच्या केंद्रस्थानी आले. आता प्रशासन काय निर्णय घेते, तनपुरेंच्या बिनविरोध निवडीत ही तांत्रिक अडचण निर्माण होते का,याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान पानसरे यांनी अक्षेप घेतल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय राखून ठेवला असून सायं. ७ वाजता यावर निर्णय घेतला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

### बिनविरोध विजयी उमेदवार

१.अहिल्यानगर – प्राजक्त तनपुरे (भाजप)
२. वर्धा–गडचिरोली–चंद्रपूर – अरुण लखाणी (भाजप)
३. पुणे – विक्रम काकडे (राष्ट्रवादी काँग्रेस)
४. ठाणे – रवींद्र फाटक (शिवसेना)
५. रायगड–रत्नागिरी–सिंधुदुर्ग – अनिकेत तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस)
६. यवतमाळ – दुष्यंत चतुर्वेदी (शिवसेना)

### अकरा मतदारसंघातील प्रमुख लढती

१. सोलापूर : राजेंद्र राऊत (भाजप) विरुद्ध वसंतराव देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार)

२. जळगाव : नंदकिशोर महाजन (भाजप) विरुद्ध शरद तायडे (ठाकरेंची शिवसेना) विरुद्ध रेश्मा काळे (शिंदेंची शिवसेना बंडखोर) ३. सांगली–सातारा : धैर्यशील कदम (भाजप) विरुद्ध अभयसिंह जगताप (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार ) विरुद्ध किशोर धुमाळ (अपक्ष) ४. नांदेड : अमर राजूरकर (भाजप) विरुद्ध रामदास पाटील (काँग्रेस) ५. भंडारा–गोंदिया : नरेश ईश्वरकर (काँग्रेस पाठिंबा) विरुद्ध अविनाश ब्राह्मणकर (भाजप)

६. नाशिक : गोकुळ गीते (अपक्ष) विरुद्ध नरेंद्र दराडे (शिवसेना)

७. अमरावती : हर्षदीप देशमुख (काँग्रेस) विरुद्ध प्रवीण पोटे (भाजप) विरुद्ध निलेश विश्वकर्मा (वंचित ) ८. धाराशिव–लातूर–बीड : बसवराज पाटील (भाजप) विरुद्ध महेश देशमुख (काँग्रेस)

९. परभणी–हिंगोली : सईद खान (शिवसेना) विरुद्ध डॉ. विवेक नावंदर (ठाकरेंची शिवसेना) विरुद्ध सुशील देशमुख (अपक्ष) १०. छत्रपती संभाजीनगर–जालना : सुहास शिरसाट (भाजप) विरुद्ध गणेश लोखंडे (ठाकरेंची शिवसेना) ११. नागपूर (पोटनिवडणूक) : डॉ. राजीव पोतदार (भाजप) विरुद्ध अतुल लोंढे (काँग्रेस)

# मुळा डॅम वरून पाणी निघालं, पण वाटेत जिरलं कुठं ?

**फेज – टू, अमृत पाणीपुरवठा योजनेत २५० कोटींच्या घोटाळ्याचा आरोप करत किरण काळेंची नगर विकासकडे सखोल चौकशीची मागणी । नगरकर तहानलेले, ठेकेदार तुपाशी; पाणी योजनांतील भ्रष्टाचार बाहेर काढा – ठाकरे शिवसेना**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** फेस टू अमृत पाणीपुरवठा योजनेवरून ठाकरे शिवसेना आक्रमक झाली आहे ४९५ कोटींचं जागतिक बँकेकडून कर्ज घेण्याच्या मनपाच्या हालचालींच्या पार्श्वभूमीवर शहर प्रमुख किरण काळे यांनी थेट नजर विकास खात्याकडे यापूर्वी शहरासाठी राबवलेल्या दोन प्रमुख योजनांच्या कामांमध्ये सुमारे अडीचशे कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप करत या कामांच्या सखल चौकशीची मागणी केली आहे. त्यामुळे मुळ्या मारून निघालेला पाणी वाटेत नेमकं जिरलं कुठं असा प्रश्न काळे यांनी उपस्थित केला आहे.



अहिल्यानगरकरांना पाणी मिळाले नाही, पण शेकडो कोटी रुपये खर्च झाल्याचे दाखवण्यात आले. मग हे पैसे नेमके गेले कुठे? पाणी गायब झाले की पैसा गायब झाला? असा संतप्त सवाल उपस्थित करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी फेज–२ आणि अमृत पाणीपुरवठा योजनांतील निकृष्ट कामे व भ्रष्टाचाराच्या सखोल चौकशीची मागणी राज्य शासनाकडे केली आहे. नगर विकास मंत्री व खात्याच्या प्रधान सचिवांकडे लेखी तक्रारीद्वारे काळेंनी ही मागणी केली आहे. त्यामुळे मनपा प्रशासनातील अनेकांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत. पाठविलेल्या तक्रारीत काळे यांनी सरकार, मनपा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांच्या कारभारावर जोरदार हल्लाबोल केला आहे. फेज–२ आणि अमृत पाणीपुरवठा योजनांवर सुमारे ३०० कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च करण्यात आला. मात्र आजही शहरातील अनेक भागांत एक दिवसाआड पाणीपुरवठा होतो, काही भागांत तीन–चार दिवसांनी नळाला पाणी येते, तर अनेक नागरिकांना टँकरच्या भरवशावर जगावे लागत आहे. ‘‘नगरकर तहानलेले आणि ठेकेदार तुपाशी‘‘ अशी परिस्थिती आज शहरात निर्माण झाली आहे. पाणी योजनांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी झाली, पण नागरिकांच्या हाती मात्र रिकामे हंडे आणि कोरडे नळ आले, अशी घणाघाती टीका काळे यांनी केली.

**‘या’ बाबींची चौकशी करा :**

फेज–२ आणि अमृत योजनांना आजपर्यंत पूर्णता प्रमाणपत्रे मिळाली आहेत का? कामे मंजूर आराखड्यानुसार झाली का? गुणवत्ता चाचण्या योग्य झाल्या का? निविदा प्रक्रियेत काही गैरव्यवहार झाला का? खर्च झालेल्या पैशांच्या तुलनेत पाणीपुरवठा का वाढला नाही? या सर्व प्रश्नांची उत्तरे शासनाने सखोल चौकशी करून जनतेसमोर ठेवावीत, अशी मागणी काळेंनी केली आहे. काळे म्हणाले की, आधीच्या ३०० कोटी रुपयांच्या कामांचा हिशोब देण्यास मनपा प्रशासन आणि सत्ताधारी तयार नाहीत. मात्र त्याचवेळी जागतिक बँकेच्या माध्यमातून नव्याने शेकडो कोटी रुपयांचे कर्ज काढण्याची तयारी सुरू आहे. आधीच्या योजनांचे अपयश लपवण्यासाठी आणि नव्या कर्जाच्या माध्यमातून ठेकेदार, आपले बगल बच्चे यांना पोसण्यासाठी हा डाव रचला जात असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

### योजनांचे तांत्रिक लेखापरीक्षण करा:

महापालिकेकडे कर्मचारी पगार, वीजबिले आणि मूलभूत कामांसाठी निधी नाही. तरीदेखील नव्या कर्जाचा डोंगर नगरकरांच्या माथी मारण्याची तयारी सुरू आहे. त्यामुळे फेज–२ आणि अमृत योजनांची न्याय्य, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. योजनांचे तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात यावे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही नव्या कर्जाधारित पाणी योजनेस मंजुरी देऊ नये, अशी मागणी ठाकरे शिवसेनेने राज्य शासनाकडे केली आहे.

### चौकशी झाली तर अनेकांना बेड्या :

राज्यात महायुतीचे सरकार आहे. विरोधी पक्ष असणाऱ्या ठाकरे सेनेच्या किरण काळे यांनी चौकशीची मागणी केली आहे. सरकार त्याला किती दात देते हे पहावे लागणार आहे. पण खरोखर प्रत्यक्ष चौकशी समिती नेमली गेली आणि फील्डवर उतरून केलेल्या कामांची तपासणी केली गेली तर धक्कादायक गोष्टी उजेडात येऊ शकतात. कोट्यवधी रुपयांची बिले लाटून प्रत्यक्षात कामच केलेले नाही असा काळे यांचा दावा आहे. तसे आढळून आले तर मनपाच्या अनेक अधिकारी, ठेकेदार यांना बेड्या पडल्या तर आश्चर्य वाटायला नको.

# मौजमजेसाठी दुचाकी चोरणारा जेरबंद

**तोफखाना पोलिसांकडून साडेसहा लाखांच्या १२ मोटारसायकली जप्त**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरात मौजमजेसाठी मोटारसायकल चोरणाऱ्या एका सराईत चोराला अटक करण्यात तोफखाना पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाला यश आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून तब्बल ६ लाख ६० हजार रुपये किमतीच्या १२ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे तोफखाना पोलीस स्टेशनमधील ४ आणि कोतवाली पोलीस स्टेशनमधील १ असे एकूण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत वाढत्या दुचाकी चोऱ्यांच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी गुन्हे शोध पथकाला पेट्रोलिंगचे आदेश दिले होते. त्यानुसार, गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर व त्यांचे पथक पेट्रोलिंग करत असताना, विना नंबरच्या मोटारसायकलवर संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका इसमाला त्यांनी थांबवण्याचा इशारा केला. तो पळून जाण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले.

त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव कृष्णा उमेश अंतरकर (वय २९ वर्षे, रा. शिवशक्ती नगर, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) असे सांगितले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली, परंतु पोलिसांनी सखोल चौकशी केली असता, त्याने नगर शहरातून अनेक दुचाकी चोरल्याची कबुली दिली. त्याच्याकडून १२ मोटरसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

### पथकात यांचा सहभाग

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबमे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखान्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार नितीन उगलमुगले, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार, सुधीर खाडे, सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतीश त्रिभुवन, सुजय हिवाळे, भागवत बांगर, सतीश शिंदे, शाकीर सय्यद, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड, जिजा खुडे, आणि कल्पना अवसरे यांचा सहभाग होता. तांत्रिक तपासात दक्षिण मोबाईल सेलच्या राहुल गुंडू, नितीन शिंदे आणि अरुण सांगळे यांनी मदत केली.

# मावा व सुगंधी तंबाखू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर छापा

**दोन ठिकाणी कारवाईत सव्वातीन लाखांचा मुद्देमाल जप्त । दोनजण ताब्यात**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत अवैधरित्या मावा आणि सुगंधी तंबाखू बनविणाऱ्या दोन वेगवेगळ्या ठिकाणांवर पोलिसांनी छापे टाकू एकूण ३ लाख ३४ हजार ७५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना तोफखाना हद्दीत अवैध मावा तयार होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी ■ पान ४ वर

### यांनी केली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, सफौ राकेश खेडकर, राजू सुद्रीक, अजिनाथ पालवे, मुकुंद दुधाळ, साईनाथ टेमकर, संदीपान पितळे आणि इतर पोलीस अंमलदारांच्या पथकाने केली.



## देशाच्या विकासाचा पाया असलेल्या जनगणनेसाठी नागरिकांनी पुढे यावे – आयुक्त यशवंत डांगे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देशाच्या भविष्याचा आराखडा तयार करणाऱ्या आणि शासनाच्या विकास योजनांना दिशा देणाऱ्या जनगणना २०२७ च्या घरगणना टप्प्यातील पहिले पंधरा दिवस पूर्ण झाले आहेत.या कामास गती मिळून विहित मुदतीत जनगणना कार्य पूर्ण व्हावे म्हणून प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी अहिल्यानगरकरांना आवाहन केले आहे.



‘‘आपल्या दारी येणारा प्रगणक हा केवळ कर्मचारी नसून तो राष्ट्रनिर्मितीच्या महत्त्वपूर्ण कार्याचा दूत आहे. उन्हाचा तडाखा, व्यस्त दिनक्रम आणि विविध अडचणींचा सामना करत तो आपल्या घरापर्यंत पोहोचत आहे. अशा वेळी दरवाजा न उघडणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे किंवा चुकीची माहिती देणे हे केवळ जनगणना प्रक्रियेलाच नव्हे तर देशाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारे ठरते,‘‘ असे आयुक्त डांगे यांनी म्हटले आहे.

ते पुढे म्हणाले की, ‘‘जनगणना ही कोणत्याही व्यक्तीची किंवा कार्यालयाची मोहीम नसून ती संपूर्ण राष्ट्राची जबाबदारी आहे. आज आपण दिलेली अचूक माहिती उद्याच्या पिढ्यांसाठी शाळा, रस्ते, रुग्णालये, पाणीपुरवठा, घरे आणि विविध कल्याणकारी योजनांचे नियोजन ठरविण्यास मदत करते. ■ पान ४ वर

# कर्जमाफीत शेतकऱ्यांची फसवणूक; भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून आदेशाची होळी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन आदेशामध्ये अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आल्या असून त्या तातडीने रद्द झाल्या पाहिजे. यावेळची कर्जमाफी आजपर्यंतच्या सर्व कर्जमाफीमध्ये सर्वात कडक अटी शर्ती असलेली व खूप कमी शेतकऱ्यांना लाभ देणारी ठरणार आहे. त्यासाठी सरकारने सरसकट कर्जमाफी केली पाहिजे अशा मागण्या करत कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन निर्णयाच्या विरोधात भूमिपूत्र शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे.

पारनेर तालुक्यातील देसवडे येथे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या नेतृत्वाखाली अशोक सानप यांचे आमरण उपोषण



**अहिल्यानगर- कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर येथील माथाडी कामगार अशोक किसन सानप यांच्यावर होत असलेल्या कथित अन्यायाविरोधात निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. उपोषणकर्ते अशोक सानप यांनी दिलेल्या निवेदनात माथाडी कामगार परवान्याच्या नूतनीकरणासाठी आवश्यक शिफारसपत्र व कागदपत्रे संबंधित कार्यालयांकडून दीर्घकाळ प्रलंबित ठेवण्यात आल्याचा आरोप केला आहे. तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता सभासदत्व रद्द करण्यात आल्याने रोजगारापासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नोंदणीकृत माथाडी कामगार असूनही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात काम करण्यास अडथळे निर्माण केले जात असल्याचा दावा करत शिफारसपत्राच्या अटीचा कायदेशीर आधार स्पष्ट करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. हमालांच्या वेतनातून विविध प्रकारच्या कपाती होत असताना वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळत नसल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे.निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच माथाडी कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या उपोषणात निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या जिल्हाध्यक्षा शितलताई गोरे, शहरजिल्हाध्यक्ष मनोज कर्डीले, तालुका उपाध्यक्ष अविनाश अकोलकर, तालुका अध्यक्षा मीना खोमणे, तालुका संघटक सागर शेळके, अल्ताफ सय्यद, अमोल सानप, कपिल उल्हारे, सुभाष भोर, लक्ष्मण कांबळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.**

### नोटीसविना गाईचा गोठा, दुकान व शेडची तोडफोड; ३५ लाखांच्या नुकसानीचा आरोप

**अहिल्यानगर - सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही पूर्वसूचना, कायदेशीर नोटीस किंवा सक्षम आदेश न देता गाईचा गोठा, दुकान, पत्र्याचे शेड आणि लोखंडी पिंजरे पाडून सुमारे ३० ते ३५ लाख रुपयांचे नुकसान केल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते स्टीफन दिलीप पंचमुख यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून नुकसानभरपाई देण्याची मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. न्यू बेथेल कॉलनी, कोठी पाटील हॉस्पिटलजवळ राहणारे स्टीफन पंचमुख यांनी दिलेल्या निवेदनानुसार, क्लेरा ब्रूस बॉईज हायस्कूल मैदान परिसरातील वाईडर चर्च मिनिस्ट्री संस्थेने त्यांना उदरनिर्वाहासाठी जागा उपलब्ध करून दिली होती त्या जागेमध्ये स्टीफन पंचमुख यांनी दुकान पत्राचे शेड पिंजरे गोठा इत्यादी तयार केले होते व त्यामध्ये त्यांनी २० गायी, १४ वासरे, १३ बकऱ्या तसेच जर्मन शेफर्ड, लॅब्राडोर, डॉबरमन, गोल्डन रिट्रिव्हर आणि हस्की जातीच्या कुत्र्यांसाठी गोठा व लोखंडी पिंजरे उभारले होते. याच ठिकाणी त्यांचे दुकानही सुरू होते. पंचमुख यांनी म्हटले आहे की, क्लेरा ब्रूस बॉईज हायस्कूल मैदानाच्या मालकीचा वाद न्यायालयात प्रलंबित असून अंतिम निर्णय होईपर्यंत संबंधित क्षेत्र तहसीलदारांच्या ताब्यात राहील, असे न्यायालयाचे आदेश आहेत. विशेष म्हणजे, १५ मार्च २०२६ रोजी सामाजिक वनीकरण विभागाच्या वनपालांनी दिलेल्या अहवालात सदर जमीन खडकाळ उताराची असून लागवडीसाठी योग्य नसल्याने प्रस्तावित काम रद्द करण्यात आल्याचे लेखी नमूद करण्यात आले होते. असे असताना ४ एप्रिल २०२६ रोजी कोणाच्या आदेशावरून जमीन नांगरणी, सपाटीकरण आणि तोडफोड करण्यात आली, असा सवाल पंचमुख यांनी उपस्थित केला आहे.**

# ७ जुन रोजी अहिल्यानगर येथे 'अस्मिता खेलो इंडिया वूमेन्स सायकलिंग लीग'व वर्ल्ड सायकल डे निमित्त सायकलिंग स्पर्धेचे आयोजन

## अहिल्यानगर येथे रंगणार महिला सायकलपटूंचा थरार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथे जागतिक सायकल दिवस निमित्त विविध गटांमध्ये सायकलिंग स्पर्धा तसेचअस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग'' जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन पेमराज सारडा महाविद्यालय मैदानावर करण्यात आ ले आहे.या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील नामांकित महिला सायकलपटू अहिल्यानगरमध्ये दाखल होणार आहेत.ही लीग दोन गटांमध्ये होणार असून, त्यामध्ये वुमेन्स इलीट (खुला गट १९चे पुढे)आणि वुमेन्स जूनिअर(ज्युनिअर मुली१५ते१८, वयोगट) सब ज्युनिअर गट (वय १०ते १४गट) या तीन प्रकारात मुली च्या सायकल स्पर्धा होतील विजेत्या खेळाडूंना मेडल्स रोख रक्कम, सर्टिफिकेट व सहभागी सर्व खेळाडू ना सर्टिफिकेट देण्यात येणार आहे तरी जिल्हातील जास्तीत जास्त मुलींनी सहभाग घ्यावा असे आवाहन प्रा.संजय साठे सचिव यांनी केले आहे

महिलांना सायकलिंग खेळात प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवोदित सायकलपटूंना राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी संधी मिळवून देण्यासाठी अस्मिता खेलो इंडिया उपक्रमांतर्गत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सलग दुसऱ्या वर्षी इतक्या मोठ्या प्रमाणात महिलांसाठी सायकलिंग स्पर्धा होत असल्यामुळे खेळाडूंसह क्रीडा प्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.तसेच हौसी पुरूषासाठी ४०कि.मी सायकल राईड, तसेच मेन्स पुरुष ४०कि.मी सायकलिंग स्पर्धा व १८ वयोगटा मध्ये २०कि.मी सायकलिंग स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे या स्पर्धेसाठी रोख बक्षीस ८००००/रुपये ठेवले आहे.

या सर्व सायकलिंग स्पर्धा पेमराज सारडा महाविद्यालय मैदानावर रविवारी सकाळी ६ वाजता स्लो झोन सुरूवात होऊन स्पर्धा पत्रकार चौक– डी एस पी चौक–स्टेट बँक चौक –चाँदनी चौक –सोल्हापुर चौक –टँक मुझीयम पासून सायकलिंग स्पर्धा सुरू होईल पुढे स्पर्धा पुरूषांच्या सायकलिंग स्पर्धा पुढे वाळुंज पासून चाँदबिबी बायपास चौकातून परत टँकर मुझीयम पर्यंत शेवट होईल.

या स्पर्धेसाठी राष्ट्रीय सायकलिंग महासंघ,खेलो इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र,

सायकलिंग असोसिएशन ऑफ अहिल्यानगर ,ईनिफिटी सायकलिंग अँकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धे साठी जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालयाचे विशेष सहकार्य लाभले आहे.

जास्तीत जास्त महीला खेळाडू नी रजिस्ट्रेशन करून सहभागी व्हावे. आवश्यक त्या सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून, सुरक्षेपासून ते वैद्यकीय सुविधा,नाष्टा जलपान व्यवस्थेपर्यंत सर्व बाबींचा काटेकोर नियोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेमध्ये अहिल्यानगर मध्ये अनेक महिला व पुरुष सायकलपटू आपले कौशल्य दाखवण्यासाठी येणार असून,विजेत्यांना रोख बक्षीस,सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र मिळाणार आहे

स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ६ वाजता वाजता होणार असून मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होईल.जिल्ह्यातील नागरिक, क्रीडा प्रेमींनी या स्पर्धे ला उपस्थित राहून महिला सायकलपटूंना प्रोत्साहन द्यावे.असे आवाहन सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्र चे सचिव प्रा.संजय साठे यांनी केले. तसेच स्पर्धा नियोजनासाठी प्रा.साईनाथ थोरात, संभाजी मोहिते ( ईनीफिटी अँकॅडमी संचालक) प्रा.संजय धोपावकर,शैलेश गवळी,जनार्धन कोळपकर रावसाहेब बाबर,दिनेश भालेराव,अविनाश काळे,विनायक भुतकर काम पाहत आहेत.तसेच सायकलिग स्पर्धेच्या टेक्निकल संभाजी मोहीते व त्यांची टिम पाहणार आहे.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अहिल्यानगरच्या आय.एम.एस.सी.डी.आर.ला पुरस्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय.एम.एस.सी. डी.आर.) या संस्थेची प्रतिष्ठित साठी निवड झाली असून, संस्थेला या राज्यस्तरीय मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

संस्थेचा शैक्षणिक व प्रशासकीय दर्जा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्कृष्ट प्लेसमेंट्स तसेच आधुनिक पायाभूत सुविधांची दखल घेत परीक्षक समितीने आय.एम.एस.सी.डी.आर.ची निवड केली. या श्रेणीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा २९ मे २०२६ रोजी बंगळुरू येथील 'ताज वेस्ट एन्ड' हॉटेलमध्ये पार पडला.या पुरस्कारासाठी संस्थांचे विविध निकषांच्या आधारे मूल्यमापन करण्यात आले. त्यामध्ये विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धती, अनुभवी व संशोधनाभिमुख प्राध्यापकवर्ग, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, कौशल्यविकासासाठीचे प्रशिक्षण उपक्रम, प्लेसमेंटची गुणवत्ता, आधुनिक सुविधा, प्रभावी प्रशासन, संशोधन व नवोपक्रमांना प्रोत्साहन तसेच बदलत्या शैक्षणिक व तांत्रिक प्रवाहाशी जुळवून घेण्याची क्षमता यांचा समावेश होता.

पुनर्मानांकित असलेल्या आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये एमबीए, एमसीए, बीबीए, बीसीए यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच विविध कौशल्याधारित आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. आधुनिक डिजिटल वर्गखोल्या, सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, उद्योगसंलग्न उपक्रम आणि प्रभावी प्लेसमेंट सहाय्य यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध होत आहेत.

संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता आणि उपसंचालक डॉ. विक्रम बार्नाबस यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. तसेच या पुरस्कारासाठी झालेल्या बी–स्कूल सर्व्हे सहभागाचे समन्वय कार्य प्रा. गौरी पाटील यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.या राष्ट्रीय सन्मानाबद्दल बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नाबस आणि सचिव श्री. विशाल बार्नाबस यांनी संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नाबस तसेच आय.एम.एस.सी.डी.आर.मधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार संस्थेच्या सामूहिक प्रयत्नांचे आणि शैक्षणिक उत्कृष्टतेच्या सातत्यपूर्ण वाटचालीचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या राष्ट्रीय सन्मानामुळे आय.एम.एस.सी.डी. आर.च्या शैक्षणिक कार्याचा गौरव झाला असून विद्यार्थी, पालक, शिक्षक, माजी विद्यार्थी आणि संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरत आहे.

## अहिल्यानगरच्या सीए शंकर अंदानी यांचा साहित्यविश्वात विक्रमांचा पंचमहायज्ञ; एकाच दिवशी पाच जागतिक विक्रमांची नोंद

### १०४ स्वलिखित पुस्तके, १२ हजारांहून अधिक कविता आणि देशातील शेकडो कवींच्या सहभागातून उभा राहिला साहित्यिक विक्रम । लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सकडून गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदी व मराठी साहित्य क्षेत्रात अभूतपूर्व आणि ऐतिहासिक कामगिरी करत अहिल्यानगरचे सुपुत्र तथा प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट सीए शंकर घनश्यामदास अंदानी यांनी एकाच दिवशी पाच जागतिक विक्रमांची नोंद आपल्या नावावर करत साहित्यविश्वात नवा इतिहास रचला आहे. साहित्य निर्मिती, कविता संकलन आणि विक्रमी प्रमाणात पुस्तक प्रकाशन या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावरील लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने घेतली आहे.

सीए अंदानी यांनी एकाच दिवशी तब्बल १०४ स्वलिखित पुस्तके प्रकाशित करून जागतिक विक्रम प्रस्थापित केला. याशिवाय त्यांनी लिहिलेल्या १२ हजार १०० हून अधिक कवितांचे विविध पुस्तकांद्वारे प्रकाशन करण्यात आले असून हा देखील एक स्वतंत्र जागतिक विक्रम म्हणून नोंदविण्यात आला आहे. 'माँ की ममता' आणि 'माँ अनेकता की शक्ति' या शीर्षकाखाली प्रकाशित करण्यात आलेल्या हिंदी काव्यसंग्रहात देशभरातील १४० कवींच्या कविता संकलित करण्यात आल्या आहेत. आई या विषयावर इतक्या मोठ्या प्रमाणात काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा हा जगातील पहिलाच प्रयत्न असल्याचा दावा करण्यात येत आहे. विविध राज्यांतील कवींच्या रचनांना एकत्रित आणून तयार करण्यात आलेला हा काव्यसंग्रह हिंदी साहित्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

याचबरोबर 'वडील : बाबा अबोल जीवनाचे कोडे' या शीर्षकाखाली महाराष्ट्रातील ८० कवींच्या ११६१ कवितांचे संकलन करून मराठी भाषेतील एक भव्य काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला आहे. तसेच 'बहिण माझी प्रिय ताई' या नावाने बहिणीवरील ११६१ कवितांचे स्वतंत्र संकलनही प्रकाशित करण्यात आले आहे. कुटुंबव्यवस्थेतील नातेसंबंधांवर आधारित हे साहित्यिक उपक्रम विशेष ठरत आहेत.

साहित्य क्षेत्रातील या विक्रमी कार्याबद्दल सीए अंदानी यांच्या नावावर एकाच दिवशी पाच जागतिक विक्रमांची नोंद करण्यात आली. या विक्रमांच्या प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा



पुणे येथील पत्रकार भवन ऑडिटोरियममध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महामंडलेश्वर आचार्य डॉ. कृष्णदेव गिरी महाराज होते. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते राजेश पांडेय, सहकारी बँकेचे मुख्य प्रशासक विद्याधर अनारसे, लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्सचे बाबी करनानी, अभिजीत जोशी, पद्मश्री भिकू रामजी इदाते, पद्मश्री डॉ. उदय देशपांडे, पद्मश्री चैत्रम पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

आचार्य डॉ. कृष्णदेव गिरी महाराज म्हणाले की, हा सोहळा केवळ एका व्यक्तीच्या सन्मानाचा नसून साहित्य, समाजसेवा आणि अथक परिश्रम यांच्या गौरवाचा सोहळा आहे. सीए शंकर अंदानी यांनी केलेले कार्य पाहिले तर त्यामागे अपार मेहनत, निष्ठा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी स्पष्टपणे दिसून येते. एकाच दिवशी १०४ पुस्तके प्रकाशित करणे, हजारो कविता लिहिणे, शेकडो कवींच्या रचनांचे संकलन करणे आणि साहित्य क्षेत्रात पाच जागतिक विक्रम प्रस्थापित करणे हे अत्यंत दुर्मिळ आणि अभिमानास्पद कार्य आहे. हे केवळ संख्येचे यश नाही, तर साहित्य संवर्धनाची एक मोठी चळवळ आहे. विशेष म्हणजे त्यांनी आई, वडील आणि बहिण यांसारख्या भारतीय संस्कृतीतील पवित्र नात्यांवर आधारित काव्यसंग्रह प्रकाशित करून समाजाला संस्कारमूल्यांची आठवण करून दिली आहे. साहित्याच्या माध्यमातून कुटुंबव्यवस्था, मानवी मूल्ये आणि सामाजिक ऐक्य जपण्याचा आणि संस्कार रुजविण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांनी देखील सीए अंदानी यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रीय आइस हॉकी स्पर्धेसाठी ऐम स्पोर्ट्स अकॅडमीच्या १२ खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या ऐम स्पोर्ट्स अकॅडमीच्या १२ खेळाडूंची राष्ट्रीय आइस हॉकी अजिंक्यपद स्पर्धे साठी महाराष्ट्र संघात निवड झाली असून, या यशामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या खेळाडूंचा जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे व बाळासाहेब खोमणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्राचे आणि अहिल्यानगरचे नाव उंचावावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

अकॅडमीचे प्रशिक्षक शुभम करपे आणि प्रमोद डोंगरे यांनीही खेळाडूंना शुभेच्छा देताना त्यांच्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले. गेल्या काही वर्षांपासून आइस हॉकी आणि आइस स्केटिंग या खेळांच्या प्रसारासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. आइस हॉकी असोसिएशन महाराष्ट्रचे सचिव सूरज पवार यांनीही निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. त्यांनी खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धे साठी शुभेच्छा देत महाराष्ट्र संघ उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला.

राष्ट्रीय आइस हॉकी अजिंक्यपद स्पर्धा ११ जून ते ८ जुलै २०२६ या कालावधीत देहरादून येथे होणार आहे. देशभरातील विविध राज्यांतील अव्वल खेळाडू या स्पर्धे त सहभागी होणार असून, महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने निवड झालेल्या खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

पुणे येथील पी–५२ आइस स्केटिंग अरेना येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय निवड चाचण्यांमध्ये ऐम स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, वेग, तांत्रिक प्राविण्य आणि संघभावनेचे प्रदर्शन करत निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या सातत्यपूर्ण सरावाचे आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे हे यश मानले जात आहे.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये अंडर–१२ मुलांच्या गटातून राजवीर जगताप याची निवड झाली आहे. अंडर–१२ मुलींच्या गटातून मतीशा सोनवणे, अर्फा खान आणि तनया क्यादर यांनी महाराष्ट्र संघात स्थान मिळवले आहे. अंडर–१५ मुलांच्या गटातून भावेश वाघ याची निवड झाली असून अंडर–१८ मुलांच्या गटातून ईशांत गर्जे, अर्श मुलाणी आणि आयुष पगारे यांना संधी मिळाली आहे.

वरिष्ठ पुरुष गटात वेदांत गर्जे, कार्तिक मिश्रा, आदित्य मरकड यांची निवड झाली असून, वरिष्ठ महिला गटात अभिजिता जगताप हिने महाराष्ट्र संघात स्थान पटकावले आहे. विविध वयोगटांमधून एकाच अकॅडमीच्या १२ खेळाडूंची झालेली निवड ही अभिमानास्पद ठरली आहे.

## जागतिक सायकल दिनानिमित्त निमगाव वाघात विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** निमगाव वाघा (ता. नगर) येथे मेरा युवा भारत अहिल्यानगर आणि श्री नवनाथ युवा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने नवनाथ विद्यालयात जागतिक सायकल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी गावातून सायकल रॅली काढून पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला.

विद्यालय परिसरातून मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीला प्रारंभ करण्यात आले. याप्रसंगी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, उपशिक्षक शरद भोस, मंदा साळवे, स्वाती इथापे, तृप्ती वाघमारे, प्रमोद थिटे, निकिता रासकर–शिंदे, श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे, प्रशांत जाधव यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायकल रॅलीचे गावातील प्रमुख रस्त्यांवरून उत्साहात मार्गक्रमण झाले. विद्यार्थ्यांनी ''सायकल चालवा–आरोग्य जपा'', ''इंधन वाचवा–देश वाचवा'', ''प्रदूषणमुक्त पर्यावरणासाठी सायकलचा वापर करा'' अशा घोषणा दिल्या. या रॅलीमुळे ग्रामस्थांचे लक्ष वेधले गेले असून पर्यावरणपूरक वाहतुकीचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमात सायकलचे आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. वाढते वाहन प्रदूषण, इंधनाचा



वाढता वापर आणि बदलते पर्यावरणीय संतुलन यामुळे सायकलचा वापर ही काळाची गरज बनली असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. दैनंदिन जीवनात शक्य तितक्या वेळा सायकलचा वापर केल्यास आरोग्य सुधारण्याबरोबरच पर्यावरणाचे संरक्षणही होऊ शकते, असा संदेश देण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी सायकल चालविण्याचा संकल्प करत पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमास मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष आणि रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, ''सायकल हे केवळ वाहतुकीचे साधन नसून निरोगी जीवनशैलीचे प्रतीक आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि वाढत्या प्रदूषणाच्या समस्येमध्ये सायकलचा वापर वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. सायकलमुळे इंधनाची बचत होते, पर्यावरणाचे रक्षण होते आणि शारीरिक आरोग्यही उत्तम राहते. विद्यार्थ्यांनी आज दिलेला संदेश समाजासाठी प्रेरणादायी आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### जयराम आंग्रे यांच्यावर जीवघेणा हल्ला; आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

अहिल्यानगर - नगर तालुक्यातील देहेरे (ता. नगर) येथे दोन गटांमध्ये झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती पाहण्यासाठी गेलेल्या आरपीआय युवक आघाडीचे नगर तालुकाध्यक्ष जयराम सुरेश आंग्रे यांच्यावर झालेल्या कथित जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी आरोपींवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने एमआयडीसी पोलिसांकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात आरपीआयच्या शिष्टमंडळाने एमआयडीसी पोलीस ठाण्यात जाऊन हेड कॉन्स्टेबल देविदास खेडकर यांना निवेदन दिले. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते संजय कांबळे, जिल्हा सरचिटणीस विजय भांबळ, युवक जिल्हाध्यक्ष विवेक भिंगारदिवे, नगर तालुकाध्यक्ष अविनाश भोसले, कार्याध्यक्ष कृपाल भिंगारदिवे, सुरज भिंगारदिवे, शुभम ठोंबे, यशराज शिंदे, आकाश भिंगारदिवे, शुभम गायकवाड, संदीप वाघमारे, शुभम तोडमल, आनंद तागड, मायाताई जाधव यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देहेरे गावात दोन गटांमध्ये हाणामारीचा प्रकार घडला होता. गावात मोठा आरडाओरडा आणि गोंधळ सुरू असल्याने नेमकी परिस्थिती काय आहे हे पाहण्यासाठी जयराम आंग्रे घटनास्थळी गेले होते. मात्र, त्यावेळी नऊ जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे.हल्लेखोरांनी कोयते, बेसबॉल बॅट, दांडके आणि लोखंडी रॉडसारख्या घातक शस्त्रांचा वापर करून आंग्रे यांना बेदम मारहाण केली. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला आहे की, एवढी गंभीर घटना घडूनही संबंधित आरोपींवर अद्याप गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. तसेच या प्रकरणात पीडित असलेल्या जयराम आंग्रे यांच्याविरोधातच खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, जयराम आंग्रे हे नगर तालुक्यात विविध सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने कार्यरत असतात. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय भूमिका बजावत असल्याने काही व्यक्तींनी पूर्वग्रहातून त्यांच्यावर हल्ला केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. समाजातील वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने आवाज उठवत असल्यामुळे त्यांना लक्ष्य करण्यात आल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

### भाळवणीच्या त्या डॉक्टरवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

अहिल्यानगर - महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नायक कांशीराम यांच्याविषयी सोशल मीडियावर कथितरित्या अपमानकारक व आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या भाळवणी (ता. पारनेर) येथील डॉ. मंगेश बेकारसे यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, त्यांची वैद्यकीय सनद रद्द करावी तसेच त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून जिल्हाबंदीचे आदेश जारी करावेत, अशी मागणी जनहितार्थ जन आक्रोश असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रघुनाथ आंबेडकर यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेऊन निवेदन दिले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोशल मीडियावर करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह पोस्टमुळे जिल्हाभरातील आंबेडकरी समाजामध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यक्तीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कांशीराम यांच्याबद्दल अपमानास्पद मजकूर प्रसारित केल्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. या घटनेनंतर पारनेर तालुक्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच संबंधित व्यक्ती वारंवार पुरोगामी विचारसरणीविरोधात चिथावणीखोर वक्तव्य करत असून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील प्रेरणास्थान आहेत. अशा महापुरुषांबाबत अपमानास्पद वक्तव्ये किंवा पोस्ट करणे ही गंभीर सामाजिक विकृती असून अशा कृत्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ७ जुनपर्यंत ‘येलो अलर्ट’

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात दि.७ जून पर्यंत तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटांसह वादळे, हलका ते मध्यम पाऊस आणि सोसाट्याचा वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आलेली असून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ‘‘येलो अलर्ट’’ प्रसारीत करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील तमाम नागरिकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

१) मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. वीजेच्या इशा-याबाबत पृथ्वी विज्ञान मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील ‘‘दामिनी ’’ ॲप प्ले स्टोअरवरुन डाऊनलोड करावे,

२) गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

३) मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफॉर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणा-या / लोंबणा-या केबल्स् पासून दूर रहावे.

४) जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणा-या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

५) वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

६) धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणा-या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात, नदीचे वा कालव्यांच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी () काढू नये.

७) वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे.

८) शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.

९) जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. सर्व नागरिकांनी वादळी वारे, वीज, पाऊस व गारपीट यांपासून स्वतःचे व त्यांच्या जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सुचनांचे पालन करावे. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यांचेशी संपर्क साधावा. आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथील दूरध्वनी क्र.०२४१-२३२३८४४/२३५६९४० किंवा ११२, १०७७ (टोल फ्री) या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे

## श्रीरामपूर शहरात एटीएस पथकाची नियोजनबद्ध छापेमारी; चौघांची चौकशी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीरामपूर शहरात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) दाखल होत कारवाई केली, शहराच्या विविध भागांतील सात ते आठ ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानशी संबंधित रिल्स पहाणे व त्यावर आक्षेपार्ह स्वरुपाच्या प्रतिक्रीया केल्याच्या संशयावरून शहरातील चार जणांची सखोल चौकशी करुन त्यांना नोटीसाही बजविल्याचे समजते.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पाकिस्तानातील कथित गुन्हेगारी टोळ्यांशी संबंधित काही व्यक्तींशी श्रीरामपूरमधील काही तरुणांचा संपर्क असल्याची माहिती तपास यंत्रणांना प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे एटीएसने शहरातील विविध ठिकाणी नियोजनबद्ध छापेमारी करत संशयित व्यक्तींची चौकशी सुरू केली. तपास यंत्रणांच्या प्राथमिक अंदाजानुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून संपर्क प्रस्थापित करून काही महत्त्वाच्या व्यक्तींबाबत माहिती संकलित करण्याचा प्रयत्न झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांनी ३० जुलैपर्यंत ऑनलाईन हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांनी हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने प्राप्त करून ३० जुलै २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. योजनेचे अनुदान नियमितपणे सुरू राहण्यासाठी सर्व लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन पारनेर तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी केले आहे.

शासनाच्या नव्या निर्णयानुसार हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यासाठी ५० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. स्मार्टफोन असलेले लाभार्थी प्ले स्टोअरवरून ‘ ’ व ‘ ’ हे ॲप डाउनलोड करू शकतात. या ॲपवर आधार क्रमांक व मोबाईल क्रमांकाच्या साहाय्याने नोंदणी करून चेहरा किंवा बोटांच्या ठशांची पडताळणी केल्यानंतर हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त करता येईल.

ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही, अशा लाभार्थ्यांसाठी सेतू केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रांवर ही सुविधा उपलब्ध आहे. ऑनलाईन हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित तलाठी यांच्याकडे सादर करावे. या प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे व अटींची पूर्तता करणे गरजेचे आहे. लाभार्थ्यांनी स्वतःच्या आधार कार्डची छायाप्रत सोबत ठेवणे आवश्यक आहे. तसेच त्यांचा अद्ययावत मोबाईल क्रमांक बँक खात्याशी जोडलेला असणे बंधनकारक आहे. लाभार्थ्यांचे बँक खाते आधारशी संलग्न (मॅपिंग) असणे आवश्यक असून त्यानंतरच हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्याची प्रक्रिया पूर्ण करता येईल. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी विहित मुदतीत आवश्यक बाबींची पूर्तता करून हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे, असेही तहसीलदार श्रीमती सौंदाणे यांनी सांगितले आहे.

## संत तुकोबांच्या पालखीचे सात जूनला पंढरीकडे प्रस्थान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

मान्सूनच्या पहिल्या पावसानंतर वारकरी भक्तांना वेध लागते ते पंढरीच्या पांडुरंगाचे, पंढरीच्या वारीची उत्सुकता आणि विठ्ठल भेटीच्या ओढीने वारकरी आषाढी एकादशीची वाट पाहतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणारे लाखो वारकरी, हजारो दिंड्या आणि संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालख्यांसह राज्यातील अनेक जिल्ह्यातून येणाऱ्या मानाच्या पालख्या आपल्या वारीचं नियोजन करत असतात. पाऊले चालती पंढरीची वाट.. म्हणत विठ्ठल नामाचा गजर करत या पालख्यांसह हजारो वारकरी पंढरीकडे चालतात. यंदा आषाढी



एकादशी २५ जुलै रोजी होत असल्याने आत्तापासूनच पंढरीच्या वारीचं नियोजन केलं जात आहे. त्यातच, संत तुकोबांच्या वारीचं वेळापत्रक जाहीर झालं असून यंदा ७ जुलैपासून तुकोबांची पालखी पंढरीकडे प्रस्थान करणार आहे. अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. जेष्ठ वद्य सप्तमी, मंगळवार ७ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र देहू येथील मुख्य देऊळवाड्यातून संत तुकाराम महाराजांची पालखी भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरणाचा गजर करत पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. यंदाच्या पालखी सोहळ्यासाठी ह.भ.प. विक्रमसिंह उमराज मोरे, ह.भ.प. उमेश सुरेश मोरे आणि ह.भ.प. लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांची पालखी सोहळा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच पालखी रथ आणि चौघडा गाडीसाठी संस्थानतर्फे तीन बैलजोड्या खरेदी करण्यात आल्या असून त्या यंदाच्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. तुकोबारायांच्या पालखीसह संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचीही उत्सुकता वारकरी आणि विठ्ठलभक्तांना असते. त्यामुळे, आता संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आळंदीतून पंढरीकडे कधी प्रस्थान होणार हेही लवकरच समजणार आहे.

## बुरुडगाव रोड आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटीत ‘हायजीन सिटी’ माहिती फलकांचे वितरण

### स्वच्छ अन्न, निरोगी नागरिक घडविण्यासाठी हायजीन फर्स्ट संस्थेचा अभिनव उपक्रम




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत तसेच खाद्य व्यवसायिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने हायजीन फर्स्ट संस्थेच्या वतीने बुरुडगाव रोड येथील आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटीवरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांना ‘हायजीन सिटी’ माहिती फलकांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून खाद्यपदार्थ व्यवसायिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत ग्राहकांमध्येही आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यात आली.

यावेळी माजी नगरसेविका शितलताई संग्राम जगताप यांच्या हस्ते माहिती फलकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास हायजीन फर्स्ट संस्थेच्या संस्थापिका वैशाली गांधी, नगरसेवक प्रकाश भागानगरे, वैशाली मनोत तसेच आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटीतील खाद्य व्यवसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी नगरसेविका शितलताई जगताप म्हणाल्या की, हायजीन फर्स्ट संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेला ‘हायजीन सिटी’ उपक्रम शहराच्या आरोग्यदायी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. खाद्यपदार्थ विक्रेत्यांना स्वच्छतेचे धडे देऊन ग्राहकांच्या आरोग्याची जबाबदारी पार पाडण्याचा हा स्तुत्य प्रयत्न आहे. नागरिक जे अन्न खातात ते स्वच्छ, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण असणे गरजेचे आहे. स्वच्छतेच्या माध्यमातूनच निरोगी समाजाची निर्मिती होऊ शकते.

त्या पुढे म्हणाल्या की, हायजीन सिटीच्या माध्यमातून केवळ चवीचा विचार न करता आरोग्यालाही प्राधान्य दिले जात आहे. संस्थापिका वैशाली गांधी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील हॉटेल्स, चौपाट्या आणि खाद्य स्टॉल्सवर जाऊन स्वच्छतेबाबत सातत्याने जनजागृती केली. त्या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम आता दिसून येत असून अनेक खाद्य व्यवसायिक स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे पाळताना दिसत आहेत. आमदार संग्राम जगताप यांनी शहरात स्वच्छता अभियान राबवून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले, तर वैशाली गांधी यांनी नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित स्वच्छतेच्या सवयी रुजविण्याचे काम केले आहे.

संस्थापिका वैशाली गांधी म्हणाल्या की, हायजीन फर्स्ट हा उपक्रम गेल्या दहा वर्षांपासून अहिल्यानगर शहरात राबविला जात आहे. सुरुवातीच्या काळात खाद्य व्यवसायिकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र सातत्य, चिकाटी आणि जनजागृतीच्या माध्यमातून आज परिस्थिती बदलली आहे. अनेक खाद्य विक्रेते स्वच्छतेचे नियम पाळत असून ग्राहकांच्या आरोग्याला प्राधान्य देत आहेत.

त्या म्हणाल्या की, अन्नपदार्थ तयार करताना स्वच्छता राखणे ही काळाची गरज आहे. दूषित पाणी, अस्वच्छ भांडी आणि अयोग्य साठवण यामुळे अनेक आजार उद्भवतात. हायजीनचे नियम पाळण्यासाठी मोठा खर्च लागत नाही, तर फक्त सवयींमध्ये बदल करण्याची गरज असते. ग्राहकांनीही केवळ पदार्थाची चव पाहू नये, तर त्या ठिकाणची स्वच्छताही तपासावी. स्वच्छतेची संस्कृती निर्माण झाली तर नागरिकांचे आरोग्य आपोआप सुधारेल.

शहरात राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी आमदार संग्राम जगताप यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी पुढाकार घेऊन आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटी येथे ‘हायजीन सिटी’ उपक्रम प्रभावीपणे राबविला आहे. शहरातील इतर हॉटेल व्यवसायिक, फास्ट फूड स्टॉल चालक आणि चौपाटी व्यावसायिकांनीही या उपक्रमाचे अनुकरण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

नगरसेवक प्रकाश भागानगरे म्हणाले की, वैशाली गांधी यांनी हायजीन फर्स्ट संस्थेच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित अन्न मिळावे यासाठी सुरू केलेला ‘हायजीन सिटी’ उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे.

## अधिक मासातील आकर्षक भेटवस्तू खरेदीसाठी संसार सुविधामध्ये हौशी गृहिणींची गर्दी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अधिक मास सुरू झाल्यापासून आकर्षक भेटवस्तू खरेदीसाठी येथील संसार सुविधा दालनामध्ये हौशी गृहिणींची चांगलीच गर्दी दिसू लागली आहे.

सौ.आशाबाई डुंगरवाल यांनी १९८९ मध्ये १०० स्क्वेअर फूट जागेत सुरू केलेले हे दालन आज १८०० स्क्वेअर फूट मध्ये प्रशस्त विस्तार करत ग्राहक सेवेत दाखल झालेले आहे. सौ.आशाबाईचे सुपुत्र सचिन हे या दालनात सेवा देण्यासाठी तत्पर असलेले पहावयास मिळतात.

अगदी ५० रूपयांपासून २ हजार रुपयांपर्यंतच्या नित्योपयोगी दर्जेदार वस्तू येथे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. सध्याच्या धोंड्याच्या महिन्यात लाडक्या जावयाला आपलेपणाने द्यावयाच्या अनेकविध आकर्षक भेटवस्तू येथे उपलब्ध आहेत. पितळेचा थाळी सेट, तांब्याचा थाळी सेट, जर्मन-सिल्वर पूजासेट, स्टीलवर राजस्थानी मिनावर्क केलेली फॅन्सी ताटं, डबे, तांबे तसेच मिना सर्व्हिंग ट्रे, मिना वर्क असलेला चौरंग, कॉपर हंडी, तांबे आणि पितळेची मुखवास बाटली, चार्जेबल ट्रॅव्हलिंग फॅन, अर्धा लिटर क्षमतेचा इलेक्ट्रीक ट्रॅव्हल कुकर, चहा-दूध गरम करण्यासाठीची फोल्डींग किटली, प्रवासात उपयुक्त चार्जेबल ज्युसर, खाद्य पदार्थ गरम रहाण्यासाठी फॉईल टिफीन बॅग, गार-गरम पाण्यासाठी व्हॅक्यूम बॉल, पंचपात्रसारखा दिसणारा कॉपर ड्रायफ्रुट सेट, विविध आकारातील छान कलाकुसर केलेले ड्रायफ्रुट सेट, मसाले ठेवण्यासाठी स्टीलचा आकर्षक डबा, टिफीनचे अनेक लक्षवेधी प्रकार, सुंदर हॅन्डबॅग आणि ट्रॅव्हलिंग बॅग, फोल्डिंगची बादली, मिनी ग्राईडर, सोलर वॉल लॅन्च, नाविण्यपूर्ण चटणी सेट आणि दही मेकर, फॅन्सी कापूर दाणी, तव्याचे विविध प्रकार, कपड्यावरील डाग, स्वयंपाक घरातील तेलाचे डाग, बाथरूममधील डाग घालवणारे प्रभावी लिक्वीड आणि स्प्रे असे घराचे घरपण जपणारे आणि घराला परिपूर्ण बनवणारे बरेच काही या दिव्य संसार सुविधा दालनामध्ये उपलब्ध आहे.

## तुकाराम मुंढे साहेब अहिल्यानगर शहरातील हॉस्पिटल मधील मेडिकल तसेच शहरातील मावा, गुटखा विकणाऱ्यांवर कारवाई करा

### नितीन भुतारे यांची निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरामध्ये अनेक मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल आहेत या हॉस्पिटल अंतर्गत आत मध्ये मेडिकल तयार झाली आहेत ती सर्व मेडिकल ही हॉस्पिटलच्या प्रत्येक मजल्यावर तसेच हॉस्पिटलच्या आतील भागात तयार केलेले आहेत या हॉस्पिटलमध्ये रुग्णाला उपचाराकरिता दाखल केल्यावर संबंधित रुग्णांना त्याच्या आजारावर लागणारी औषधे ही त्याच रुग्णालयाच्या आत मध्ये असणाऱ्या मेडिकल मधूनच घ्यावी लागतात अशी जाचक अट सध्या अहिल्यानगर मल्टी स्पेशास्लिस्ट मधील सर्व हॉस्पिटलमध्ये आहे. एखाद्या रुग्णांवर सदर हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू असताना त्याला लागणारी औषधे ही स्वतः हॉस्पिटलच्या स्टाफ च्या माध्यमातूनच आणली जातात याची माहिती पेशंटच्या नातेवाईकाला देखील नसते हॉस्पिटलचे अंतिम बिल भरताना पेशंटच्या नातेवाईकांना पेशंटला रुग्णाला दिली जाणारी औषधांची बीले सादर केली जातात व ती विले बाजार भावापेक्षा जास्त दराने दिली जातात त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांची लुटमार करण्याचा प्रकार हॉस्पिटल मधील मेडिकल तसेच हॉस्पिटलचे सर्व संचालक मंडळ करत आहे. रुग्णाला लागणारी औषधे ही रुग्णाच्या नातेवाईकांना बाहेरच्या कुठल्याही मेडिकल मधून आणून दिली जात नाही हे संपूर्ण प्रकारे रुग्णांच्या नातेवाईकांची लुटमार आहे.औषधे विकण्याचे मोठे रॅकेट या अहिल्या नगर शहरातील सर्व हॉस्पिटलमध्ये सुरू आहे त्यामुळे आपण हे संपूर्ण रॅकेट उध्वस्त करून रुग्णांना कमी भावाने कमी दाराने औषधे बाहेरून सुद्धा खरेदी करता येईल याची दखल आपण घ्यावी सदर हॉस्पिटलच्या मेडिकल मध्ये जेनेरिक औषधे सुद्धा चढ्या भावाने विकली जातात. त्यामुळे प्रचंड लूटमार हे अहिल्यानगर शहरांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांची सुरू आहे. जर रुग्णांच्या नातेवाईकांनी रुग्णाला लागणारी औषधे बाहेरून बाजारातील मेडिकल स्टोअर मधून घेतली तर त्यांना त्या औषधाच्या बिलात सूट मिळते. परंतु असे या अहिल्या नगर शहरातील हॉस्पिटल मध्ये होत नाही सपूर्ण औषधे हॉस्पिटल पुरवितात त्या मुळे रुग्णांची, त्यांच्या नातेवाईकांची लुटमार होते. त्याकरिता आपण यामध्ये तातडीने लक्ष घालून हॉस्पिटल मधील सर्व अनाधिकृत मेडिकल बंद करावेत.

## रासायनिक खतांचा तुटवडा; शेणखतालाही चढे भाव, लहान शेतकरी अडचणीत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** खरीप हंगाम तोंडावर आला असताना रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी पर्याय म्हणून शेणखताचा वापर करण्याकडे वळले आहेत. मात्र वाढत्या मागणीमुळे शेणखतही दुर्मिळ झाले असून त्याचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे लहान व अल्पभूधारक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. तालुक्यात अनेक ठिकाणी रासायनिक खते वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांची पेरणीपूर्व मशागतीची कामे खोळंबली आहेत. परिणामी शेतकरी शेणखताचा आधार घेत आहेत. मात्र मोठ्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच मोठ्या प्रमाणात शेणखत खरेदी करून साठवून ठेवल्याने सध्या बाजारात शेणखताची कमतरता जाणवत आहे. सध्या एक ट्रॉली शेणखतासाठी तब्बल २० हजार रुपयांपर्यंत मोजावे लागत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. एवढा खर्च परवडत नसल्याने लहान शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही ठिकाणी पैसे देऊनही शेणखत उपलब्ध होत नसल्याची परिस्थिती आहे. शेणखतामुळे जमिनीचा पोत सुधारतो, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते व पिकांच्या वाढीस मदत होते. मात्र खतांच्या टंचाईमुळे आणि वाढत्या दरांमुळे शेतकऱ्यांपुढे दुहेरी संकट उभे राहिले आहे. प्रशासनाने रासायनिक खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यासोबतच खत वितरणावर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# ग्रामीण भागातील मुलींचे यश प्रेरणादायी - आमदार काशिनाथ दाते सर

## मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल वडगाव सावताळच्या कन्यांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील काजल मच्छिंद्र खामकर व सुप्रिया अशोक आंधळे यांची मुंबई पोलीस खात्यात कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाल्याबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

या सत्कार समारंभास जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, आर. एस. कापसे सर, देवराम शेठ मगर, सुभाषराव सासवडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका महिला अध्यक्षा सुषमाताई रावडे, भाऊसाहेब खामकर सर, दत्तात्रय सरोदे, प्रदीप रोकडे, माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, कैलास खामकर, मंगेश खामकर, तुषार खामकर, विठ्ठल खामकर, शैलेश जांभळकर, शुभम आंधळे,



विठ्ठल बर्डे, अमोल शिंदे, आप्पा गायकवाड, जयवंत खामकर, विश्वनाथ गोरडे, शुभम चौधरी, दिपक खामकर, मच्छिंद्र खामकर, इरफान शेख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व तालुक्यातील विविध गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारानंतर उपस्थित मान्यवरांनी दोन्ही युवतींचे अभिनंदन करत त्यांच्या भावी सेवेसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. ग्रामीण भागातील मुलींनी कठोर परिश्रम, चिकाटी आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर मिळविलेले हे यश निश्चितच नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

> ग्रामीण भागातील मुली जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. काजल खामकर आणि सुप्रिया आंधळे यांची मुंबई पोलीस दलात झालेली निवड ही केवळ त्यांच्या कुटुंबासाठी नव्हे तर संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील इतर विद्यार्थिनींनाही मोठी प्रेरणा मिळणार असून त्यांनी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत समाजसेवेचा आदर्श निर्माण करावा.
>
> **आ. काशिनाथ दाते सर**
> (विधानसभा सदस्य)

# आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या धास्तीने नगरचा अन्न भेसळ विभाग झाला खडबडून जागा

## विशेष मोहिमेत राहुरी व नेवासा तालुक्यात कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राहुरी येथील शिवशक्ती आईस्क्रीम या आस्थापनाची तपासणी करून शिवशक्ती ब्रँडच्या आईस्क्रीम गुलकंद व अमेरिकन नट्स या उत्पादनांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. दर्जाहीन असल्याच्या संशयावरून या ठिकाणी ४१ हजार ४४० रुपये किमतीचे एकूण १४८ पॅकेट्स आईस्क्रीम जप्त करण्यात आले. तसेच नेवासा तालुक्यातील कडू गल्ली येथील संतोष किराणा स्टोअर्सची तपासणी करून एसबीजी ब्रँडच्या रिफाइंड पामोलीन ऑईल या खाद्यतेलाचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला. हा साठा संशयास्पद आढळल्याने २ लाख ४२ हजार ७४० रुपये किमतीचे १ हजार ४९८.४ किलो खाद्यतेल जप्त करण्यात आले.



अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार व सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ व नियम २०११ अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार, अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. पाटील व सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी या कारवाया केल्या आहेत.

नागरिकांना स्वच्छ व भेसळमुक्त अन्न उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हाभर ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात सुरू आहे. अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

चौकट– जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या अन्न भेसळविरोधी विशेष मोहिमेत राहुरी व नेवासा तालुक्यात कारवाई करून २ लाख ८४ हजार १८० रुपये किमतीचे संशयित आईस्क्रीम व खाद्यतेल जप्त करण्यात आले असून नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी केले आहे.

# हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वास बाधक असलेला मसुदा तात्काळ मागे घेण्याबाबत विश्व हिंदू परिषद,मंदिर, अर्चक, पुरोहित संपर्क आयामाचे वतीने

## आमदार संग्राम जगताप यांना निवेदन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाद्वारे प्रस्तावित ''महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम. २०२६'' हा घटनाबाह्य व हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वास बाधक असलेला मसुदा तात्काळ मागे घेण्याबाबत विश्व हिंदू परिषद,मंदिर,अर्चक,पुरोहित संपर्क आयामाचे वतीने

आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देण्यात आले.याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचे विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे,जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,श्री तुळजाभवानी पलंगाचे मानकरी गणेश पलंगे,दिनेश परदेशी,मनोहर भाकरे, मुकुल गंधे,अंबादास गोटीपामूल आदी उपस्थित होते.

या निवेदनात सांगितल्याप्रमाणे अहिल्यानगर मतदारसंघातील तसेच राज्यातील विविध हिंदू देवस्थान संस्था,मंदिर विश्वस्त, भाविक व महाराष्ट्र मंदिर महासंघ यांनी राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या ''महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६'' या मसुद्याबाबत गंभीर आक्षेप व तीव्र चिंता व्यक्त केलेली आहे.

सदर प्रस्तावित कायद्यामुळे हिंदू देवस्थानांच्या इनाम जमिनीवरील पारंपरिक,धार्मिक व कायदेशीर हक्क संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली असून, मंदिरांच्या आर्थिक स्वायत्ततेवर व धार्मिक व्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः संविधानातील अनुच्छेद १४,२५,२६ व ३००-अ अंतर्गत संरक्षित अधिकारांवर या मसुद्यामुळे गदा येत असल्याचे विविध कायदे तज्ज्ञ,धार्मिक संस्था व नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र मंदिर महासंघाने तयार केलेले सविस्तर निवेदन, कायदेशीर आक्षेप व मागण्या यांची प्रत सोबत जोडली आहे तरी आपण सदर विषयाची गांभीर्याने दखल घ्यावी.तसेच यासंदर्भात महाराष्ट्र मंदिर महासंघाने काही मागण्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे १) ''महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६'' हा प्रस्तावित मसुदा तात्काळ मागे घेण्यात यावा.२) संबंधित सर्व हिंदू देवस्थान संस्था, कायदे तज्ज्ञ व भाविक यांच्याशी व्यापक चर्चा केल्याशिवाय कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये.३) हरकती व सूचना सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी.४) देवस्थान जमिनींचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र कठोर कायदेशीर यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

# भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचा दहावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकाल

## गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने गौरव; गुणवत्तेची परंपरा कायम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) दहावी बोर्डाच्या परीक्षेत यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या दहावी बोर्ड परीक्षेत शाळेचा १०० टक्के निकाल लागला असून, तब्बल ५९ विद्यार्थ्यांनी ९० टयांहून अधिक गुण मिळवत शाळेच्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त ॲड. गौरव मिरीकर, मुख्याध्यापक कैलास साबळे, उपमुख्याध्यापक व्ही. डी. कुलकर्णी, पर्यवेक्षक रेणुका परदेशी, नंदू जाधव, निलीमा शिंदे, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यंदाच्या निकालात गुंजन महेश गोळे हिने ९९.८० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम येण्याचा मान पटकावला. तिच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. शाळेच्या गुणवत्ता यादीत ओम संतोष मिसाळ (९८%) याने द्वितीय, नक्षत्रा भुमेश इप्पलपेल्ली (९७.८०%) हिने तृतीय, वेदिका विजय गावडे (९७.६०%) हिने चौथा, शताक्षी प्रशांत नगरकर (९७.२०%) हिने पाचवा क्रमांक मिळवला. तसेच तनिष्का बाळासाहेब गवळी आणि प्रणाली संदीप रसाळ (९६.८०%) यांनी संयुक्तपणे सहावा क्रमांक पटकावला. कांक्षिणी राहुल पांढरे (९६.६०%) हिने सातवा, तर भक्ती योगेश दळवी, सौंदर्या शंकर बिमन आणि रोहित पुष्कर तांबोळी (९६.२०%) यांनी संयुक्तपणे आठवा क्रमांक मिळवला.

यंदाच्या निकालातील आणखी एक विशेष बाब म्हणजे संस्कृत विषयात दोन विद्यार्थ्यांनी शंभरपैकी शंभर गुण मिळवून विशेष प्रावीण्य सिद्ध केले. तसेच गणित विषयातही एका विद्यार्थ्याने शंभरपैकी शंभर गुण प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची जिद्द व परिश्रम यांचा मोठा वाटा असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# स्काय ब्रिज सोसायटी ठरतेय आनंदी, सांस्कृतिक व कौटुंबिक जीवनाचे आदर्श केंद्र

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आधुनिक सुविधा, सांस्कृतिक परंपरा आणि कौटुंबिक जिव्हाळा यांचा सुंदर संगम असलेल्या स्काय ब्रिज सोसायटीत वर्षभर विविध सामाजिक, धार्मिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. सोसायटीमधील सभासदांमध्ये जिव्हाळा, आपुलकी आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करण्यात व्यवस्थापन समितीने विशेष पुढाकार घेतला आहे.

सोसायटीचे अध्यक्ष अमृतलालजी चंदूलाल कोठारी, खजिनदार मनोज अंबरचंद चंगेडिया, सचिव योगेश रामसुख मंत्री तसेच व्यवस्थापन समितीचे सभासद प्रवीण कांतीलाल भंडारी, विजय राजेंद्र गुंदेचा, दर्शन राजेंद्र सिकची, सौ. नेहा सौरभ झंवर, महावीर रसिकलाल मुथा, स्वप्नील सुरेश ओस्तवाल, पीयूष राजेंद्र कटारिया आणि सपना निनाद भलगट यांच्या नेतृत्वाखाली अनेक उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आले.

मागील वर्षभरात पर्युषण पर्व, गणेशोत्सवातील दहा दिवसांचे रंगारंग कार्यक्रम, दिवाळी, मकर संक्रांत, होळी उत्सव, वाढदिवस समारंभ, महिलांसाठी दर महिन्याला आयोजित करण्यात येणारे गेट-टुगेदर तसेच सर्व सभासदांचे पारिवारिक गेट-टुगेदर मोठ्या उत्साहात पार पडले. याशिवाय हुरडा पार्टीसारख्या विशेष उपक्रमांनाही उत्तम प्रतिसाद मिळाला.

स्काय ब्रिज सोसायटीची आधुनिक व आकर्षक सुविधा हे देखील येथील विशेष आकर्षण ठरत आहे. स्विमिंग पूल, पार्टी लॉन, किड्स प्ले एरिया, नाना-नानी पार्क, संध्याकाळच्या गप्पांसाठी खास चिटचॅट झोन अशा सुविधा सभासदांच्या दैनंदिन जीवनातील ताणतणाव दूर करण्यास मदत करत आहेत. येथे निर्माण झालेली मैत्री ही केवळ ओळख न राहता एका मोठ्या कुटुंबात रूपांतरित झाली असल्याची भावना अनेक सभासद व्यक्त करतात.

विशेष म्हणजे , गेल्या सलग ३१ महिन्यांपासून प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला सोसायटीमध्ये सामूहिक आनंदचालीसाचे आयोजन करण्यात येत आहे. समृद्धी, मनाची एकाग्रता आणि उत्तम आरोग्य यासाठी आयोजित हा आध्यात्मिक उपक्रम सभासदांसाठी श्रद्धा व सकारात्मक ऊर्जेचा स्रोत ठरत आहे. यंदाचे ३२ वे सामूहिक आनंदचालीसा पठण महासती साध्वी सुयशाजी व महासती साध्वी सुजयाजी यांच्या पावन उपस्थितीत अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. या विशेष कार्यक्रमाचे आयोजन स्काय ब्रिजचे सदस्य फुलचंद गुगळे (पाथर्डी) यांनी केले होते.

सोसायटीमध्ये साधू-संतांचे कायम आगमन होत असून, त्यांना येथे माहेरघरासारखे प्रेम, सन्मान आणि आत्मीयता लाभत असल्याची भावना व्यक्त केली जाते.
येणाऱ्या वर्षात अधिक जोमाने व उत्साहाने नवीन सांस्कृतिक, सामाजिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले असून बाहेरगावी सहलींचे आयोजनही करण्यात येणार आहे. सोसायटीच्या या उपक्रमांचे सर्व सभासदांकडून कौतुक होत असून व्यवस्थापन समितीला शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# एससी उपवर्गीकरणाविरोधात आंबेडकरी समाजाचे रणशिंग; १५ जूनच्या लाँग मार्चसाठी अहिल्यानगर सज्ज

## शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथील बैठकीत नियोजन; संविधान रक्षणासाठी आरपारच्या संघर्षाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी बीड येथून १० जून रोजी सुरू होणारा राज्यव्यापी लाँग मार्च १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात दाखल होणार असून, या लाँग मार्चचे भव्य स्वागत करण्यासाठी आणि समाजबांधवांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

टिळक रोड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे विजय भांबळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस एन. एम. पवळे, प्रा. निवृत्ती आरु, संजय कांबळे, राजीव साळवे, बुद्धानंद धांडोरे, महेंद्र मोहिते, राजेंद्र करंदीकर, यशराज शिंदे, अविनाश भोसले, विवेक भिंगारदिवे, कृपाल भिंगारदिवे, संदीप वाघमारे, अमरराम निरभवणे, अनिल इंगळे, शेखर पंचमुख, विजय गायकवाड, शिवाजी भोसले, विलास साठे, रावसाहेब कानडे, बाळासाहेब



पातारे, सूरज बोरुडे, प्रा. एल. बी. जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत लाँग मार्चचे नियोजन, स्वागत सोहळ्याची रूपरेषा, जनजागृती अभियान तसेच विविध समित्यांची स्थापना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मार्च शहरात दाखल होताना मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी व्हावेत यासाठी प्रत्येक भागात संपर्क अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. केवळ उपस्थिती वाढविण्याऐवजी अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाला विरोध का केला जात आहे, याबाबतही जनतेमध्ये व्यापक जनजागृती केली जाणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

स्वागत सोहळ्याचे नेतृत्व जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते करणार असून समता सैनिक दलालाही या आंदोलनात सहभागी करून घेण्यात येणार आहे. शहरातील विविध सामाजिक संघटना, युवक आणि महिला यांनाही या लढ्यात सहभागी करून घेण्यावर भर देण्यात आला. बैठकीत बोलताना उपस्थितांनी अनुसूचित जातींमधील बहुतांश समाजघटक उपवर्गीकरणाच्या विरोधात असल्याचा दावा केला. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असून जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. मातंग समाजासह सर्व घटकांपर्यंत जाऊन या विषयाची वस्तुस्थिती पोहोचविण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

एन.एम. पवळे म्हणाले की, अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ एका समाजाचा प्रश्न नाही, तर तो संविधानिक हक्क आणि सामाजिक न्यायाशी संबंधित विषय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या चौकटीत राहून समाजाला एकत्र ठेवण्याचे काम आपण केले पाहिजे. उपवर्गीकरणाच्या नावाखाली समाजात फूट पाडण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. बीड ते मुंबई या राज्यव्यापी लाँग मार्चमध्ये अहिल्यानगर जिल्हा मोठ्या ताकदीने सहभागी होईल. प्रत्येक गावात, प्रत्येक वस्तीत जाऊन जनजागृती करणे ही काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

(पान १ वरुन)

### प्राजक्त तनपुरे बिनविरोध

निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी सहा जागा बिनविरोध झाल्या असून, त्यात अहिल्यानगरचा समावेश आहे. दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस आणि दोन जागांवर भाजपने बिनविरोध विजय मिळवला. नगरमध्ये काँग्रेसच्या पाठिंब्यावर करण ससाणे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तर मच्छिंद्र धुमाळ, कमलेश गांधी व दत्तात्रय पानसरे असे चार अपक्ष रिंगणात होते. आज अर्जमाघारीच्या दिवशी करण ससाणे, मच्छिंद्र धुमाळ व कमलेश गांधी यांनी आपले अर्ज मागे घेतले. प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार दत्तात्रय पानसरे यांचा उमेदवारी अर्ज बाकी होता. शहाबाज सय्यद यांनी दत्तात्रय पानसरेंचा अर्ज मागे घेतल्याचे समोर आले. दुपारी तीननंतर दत्तात्रय पानसरे हे जिल्हाधिकारी कार्यालयात आले व त्यांनी आपण अर्ज मागे घेतला नसल्याचे म्हटले. त्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण होते.

### मावा व सुगंधी तंबाखू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर छापा

सपोनि माणिक चौधरी यांना कारवाईचे आदेश दिले. बारा इमाम, कोठला येथे टाकलेल्या छाप्यात शाहीद फारुख शेख (वय २५) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून मावा तयार करण्याची मशीन, सुपारी, सुगंधी तंबाखू आणि तयार मावा असा एकूण १ लाख ६६ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुलमोहर रोड आम्रपाली मंगल कार्यालयासमोरून अक्षय राजू पवार (वय १९, रा. निंबळक) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १ लाख ६८ हजार २०० रुपये किंमतीची मावा बनविण्याची मशीन व कच्चा माल जप्त करण्यात आला. असा मिळून दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ३४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटक आरोपींविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ च्या विविध कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### देशाच्या विकासाचा पाया असलेल्या जनगणनेसाठी नागरिकांनी पुढे यावे - आयुक्त यशवंत डांगे

त्यामुळे जनगणना म्हणजे केवळ माहिती संकलन नसून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली एक अमूल्य गुंतवणूक आहे.'' जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत संकलित होणारी सर्व माहिती पूर्णतः गोपनीय असून ती कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा विभागाला वैयक्तिक स्वरूपात दिली जात नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही शंका किंवा भीती न बाळगता सत्य, अचूक आणि संपूर्ण माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. घरगणनेचे उर्वरित १५ दिवस अत्यंत महत्त्वाचे असून १४ जून २०२६ पर्यंत हे कार्य पूर्ण करावयाचे आहे. त्यामुळे प्रत्येक अहिल्यानगरकराने आपल्या दारी आलेल्या प्रगणकाचे स्वागत करावे, काही मिनिटांचा वेळ द्यावा आणि मोबाईलवर होणारी जनगणना प्रक्रिया पूर्ण करून देशाच्या या ऐतिहासिक राष्ट्रीय मोहिमेत आपला मोलाचा सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी केले आहे.

### कर्जमाफीत शेतकऱ्यांची फसवणूक; भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून आदेशाची होळी

शेतकऱ्यांनी एकत्र येत कर्जमाफी आदेशाची होळी करत आंदोलन केले. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तसेच शेतकऱ्यांच्या या फसवणुकी विरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून तो राज्यभर आंदोलनाच्या माध्यमातून व्यक्त होत असल्याचा दावा यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी केला आहे. त्यामुळे आता फडणवीस सरकारच्या विरोधात शेतकरी संघटना आक्रमक होणार असल्याचे चित्र दिसत आहे. कर्जमाफीसाठी लावण्यात आलेल्या अटी रद्द करा तसेच सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, अशी किसान सभेची मागणी आहे. सरकारने कर्जमाफी करताना, २०१९ मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ ५० हजार रुपये देण्यात येणार आहे. त्यांनाही किमान दोन वर्ष नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे. अत्यल्प पगारावर राबणाऱ्या सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन द्यायचे आणि आता २ लाख कर्ज माफ करणार सांगून बहुसंख्य शेतकऱ्यांची केवळ ५० हजारावर बोळवणूक करायची ही अत्यंत संतापजनक गोष्ट असून ही शेतकऱ्यांची घोर फसवणूक असल्याची टीका भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी यावेळी बोलताना केली. कर्जमाफीसाठी लावलेल्या अटी रद्द करा. सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या. नियमित कर्जदार शेतकरी, शेड नेट, पॉली हाऊस शेतकरी, कुक्कुट पालन शेतकरी यांच्यासह सर्व पीक व शेती सुधारणा कर्ज माफ करा आदी मागण्या करण्यात आल्या. या आंदोलनावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर, सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकुडे, विशाल वाडेकर, ठमाजी भोर, रावसाहेब फटांगरे, काशिनाथ गोळे,मंजाबापू वाडेकर,पंडित गागरे सर, साहेबराव भोर, शंकर भोर, अजित वाडेकर, राहुल पारधी, देविदास टेकुडे, किरण फटांगरे, तेजस फटांगरे, हर्षद वाडेकर, गणेश फटांगरे, बाळासाहेब वाडेकर, पप्पू वाडेकर, भाऊसाहेब दरेकर, एकनाथ फटांगरे, नवनाथ जाधव, सुरेश दरेकर, सचिन खाडे, साहेबराव वाडेकर, उपसरपंच सचिन भोर, शांताराम भोर, बाबासाहेब वाडेकर, पोपट फटांगरे, शंकर टेकुडे, दत्ता फटांगरे, बबन भोर, सचिन घेमूड यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.